| ७ | कनिष्ठ लिपिक कम् कॉम्प्युटर ऑपरेटर (मुख्यालयाच्या ०१ जागेसह ) | १२+१ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (B.A./B.Sc./B.Com) परीक्षा किमान ५०% गुण मिळवून उत्तीर्ण,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे या संस्थेमार्फत घेण्यात आलेली इंगजी टंकलेखन ४० शब्द प्रतिमिनिट तसेच मराठी टंकलेखन ३० शब्द प्रतिमिनिट उत्तीर्ण, MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| ८ | प्रयोगशाळा परिचर | १३ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता १२ वी ( H.S.C.) (विज्ञान ) परीक्षा किमान ५०% गुण मिळवून उत्तीर्ण |

टिप :-वरिलपैकी पद क्रमांक १ ते ४ या शिक्षक संवर्गातील पदांसाठी (मराठी व हिन्दी भाषा )वगळता इंग्रजी माध्यमातून शिक्षण झालेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**४). वयोमर्यादा**

अ) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठी अर्जदार उमेदवाराचे वय दिनांक 31 ऑक्टोबर २०१८ रोजी गणले जाईल.खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय किमान १८ वर्ष पूर्ण व कमाल ३८ वर्ष असावे.मागास वर्गीय उमेदवाराचे वय किमान १८ वर्ष पूर्ण व कमाल ४३ वर्ष असावे.

ब) जाहिरातीच्या दिनांकास सेवेत असलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा १० वर्षांनी शिथिलक्षम राहील.

क) उमेदवाराच्या वयासाठी शाळा सोडल्याचा दाखला किंवा एस.एस. सी.परीक्षा प्रमाणपत्रात नमूद केलेला जन्म दिनांक ग्राहय धरण्यात येईल.

**५.) तीन वर्षासाठी पदनिहाय प्रतिमहा एकत्रित मानधनाचा तपशिल**

| अ.नं. | पदनाम | प्रतिमहा एकत्रित मानधनाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | प्राचार्य(सरळसेवा भरती ) | रूपये ६०,०००/- |
| २ | पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक (PGT) | रूपये ४५,०००/- |
| ३ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक ( TGT ) | रूपये ३५,०००/- |
| ४ | क्रीडा शिक्षक नि विषय अध्यापक | रूपये ३५,०००/- |
| ५ | अधिक्षक ( पुरूष )प्रशिक्षित पदवीधर | रूपये २५,०००/- |
| ६ | स्त्री अधिक्षिका कम् नर्स ( प्रशिक्षित पदवीधर ) | रूपये २५,०००/- |
| ७ | कनिष्ठ लिपिक कम् कॉम्प्युटर ऑपरेटर (मुख्यालयासह ) | रूपये १५,०००/- |
| ८ | प्रयोगशाळा परिचर | रूपये १०,०००/- |

**६) .सर्वसाधारण अटी / शर्ती**

| | |
|---|---|
| ६.१ | उमेदवाराला मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असावे. |
| ६.२ | जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकाला उमेदवाराने अर्ज केलेल्या पदासाठी जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक / व्यावसायिक पात्रता धारण केलेली असावी. |
| ६.३ | अर्जदार भारताचा नागरिक असावा |
| ६.४ | इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या व अस्खलीतपणे संभाषण करणाऱ्या उमेदवाराला प्राधान्य देण्यात येईल. |
| ६.५ | जाहिरतीमध्ये नमूद केलेली सर्व पदे प्रतिमहा एकत्रित मानधनावर ०३ वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार आहेत. ३ वर्षाच्या सेवेनंतर नियुक्त उमेदवारांच्या कामाचे मूल्यमापन करण्यात येईल. ज्यांचे काम समाधानकारक आढळून येईल अशा उमेदवारांच्या सेवा भविष्यात अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत सुरु ठेवण्यात येतील. |
| ६.६ | सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या विविध पदावर निवड / नेमणूक झालेल्या उमेदवारांना केंद्र / राज्य सरकारचे कर्मचारी संबोधले जाणार नाही तसेच संबंधित उमेदवारांना तसा दावाही सांगता येणार नाही. |
| ६.७ | निवड झालेल्या उमेदवारास नेमणूकीच्या ठिकाणी निवासी राहणे बंधनकारक राहील. |
| ६.८ | निवड झालेल्या उमेदवारांना एकलव्य निवासी शाळा नियमावली - २०१५ व आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक शाआशा-२०१३/प्र.क्र.६८२/ का-१३ मंत्रालय मुंबई दिनांक ०७ मे २०१५ मधील तरतुदी बंधनकारक राहतील |
| ६.९ | निवड झालेल्या उमेदवारांना आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एकलव्य-२०१८/प्र.क्र.१२८/का-१३ मंत्रालय मुंबई दिनांक ०७ से २०१८ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार व शासनाच्या प्रचलित धोरणानुसार टप्या टप्याने नेमणूक आदेश निर्गमित करण्यात येतील. |
| ६.१० | उमेदवाराची नेमणूक ही त्याचे पूर्व चारित्र्य, वर्तणूक,शारीरिक व मानसिक क्षमता याबाबतच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील.त्यानुसार नियुक्त केलेल्या उमेदवारास जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरिक / मानसिक पात्रतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र ( Medical Fitness Certificate ) तसेच जिल्हा ग्रामिण पोलीस अधिक्षक / शहर पोलिस आयुक्त यांचे चारित्र्य पडताळणीचे ( Character Certificate ) प्रमाणपत्र संस्थेच्या सेवेत रूजू झाल्याच्या दिनांकापासून ०२ महिण्याच्या आत महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक या संस्थेच्या मुख्यालयास सादर करणे अनिवार्य राहील. |
| ६.११ | उमेदवाराने अर्जासोबत सादर केलेले कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे कोणत्याही टप्यावर खोटी / बनावट / खाडाखोड केलेली / अवैध आढळून आल्यास अशा उमेदवाराची निवड पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.तसेच संबंधित उमेदवाराविरूद्ध इतर नियम / कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ६.१२ | अर्जात नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता नसलेल्या तसेच संबंधित पदासाठी सामाजिक व समांतर आरक्षण नसलेल्या उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. |
| ६.१३ | अवैध मार्गाने निवड होण्यासाठी एखाद्या उमेदवाराने किंवा उमेदवाराच्या वतीने अन्य कोणीही इसमाने निवड समितीचे अध्यक्ष, सदस्य सचिव,सदस्य किंवा अन्य अधिकारी वा कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा दबाव,दडपण आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास अशा उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल व असा निर्णय अंतिम राहील. |
| ६.१४ | पदभरती प्रक्रीयेअंतर्गत निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणींच्या संदर्भात संस्थेचे अध्यक्ष तथा प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम राहतील. |
| ६.१५ | जाहिरातीत नमूद केलेल्या पदांची भरती करणे किंवा न करणे याबाबतचे हक्क संस्थेचे अध्यक्ष तथा प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांना राहतील. |

## ७) विशेष सूचना

| | |
|---|---|
| ७.१ | आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एकव्य -२०१८ /प्र.क्र१२८/का-१३मंत्रालय मुंबई दिनांक ०७ मे २०१८ तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन पत्र क्रमांक बीसीसी -२०१८/प्र.क्र.९५(अ)/१६-ब(सी) मंत्रालय मुंबई दिनांक १३ ऑगष्ट २०१८ नुसार शिक्षक संवर्गातील पदभरतीसाठी " पेसा क्षेत्राच्या " तरतुदी लागू राहणार नाही. |
| ७.२ | सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी -२००९ / प्र.क्र.२११/०९/१६ब मंत्रालय मुंबई दिनांक ०५ नोव्हेंबर २००९ नुसार अनु.जाती, अनु.जमाती,विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब)(क)(ड),विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्गातील उमेदवारांकरीता सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले जात पडताळणीचे प्रमाणपत्र (ValidityCertificate ) ग्राह्य धरण्यात येईल. |
| ७.३ | महिलांसाठी असलेल्या ३०% आरक्षणानुसार खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी तसेच इतर मागास वर्ग,भटक्या जमाती ( क ) (ड) उमेदवारांना उन्नत व प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सक्षम अधिकाऱ्याचे ( Non Creamy-layer Certificate ) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील |
| ७.४ | जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास शासकीय / निमशासकीय / अनुदानित संस्थेत सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यामार्फत ना हरकत प्रमाणपत्रासह सादर करणे बंधनकारक राहील. |

## ८) निवड पध्दती :-

| | |
|---|---|
| ८.१ | सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठीच्या आवश्यक अर्हतेनुसार उमेदवाराने(इयत्ता १२ वी, पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षा,B.Ed./B.P.Ed, परीक्षा ) या शालेय / विद्यापीठीय परीक्षांमध्येप्राप्त केलेले किमान ६० % गुण, Basic Aptitude Test,अध्यापन कौशल्य यांच्या आधारे Experts मार्फत मूल्यमापन करण्यात येईल.तसेच या परीक्षांच्या एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणांकन यादी तयार करून निश्चित केलेल्या किमान / कमाल गुणानुसार / गुणवत्तेनुसार उमेदवारांची जात प्रवर्गनिहाय निवड यादी व प्रतिक्षा सूचि तयार करण्यात येईल. |
| ८.२ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक ( TGT ) पदसाठी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेव्यतिरिक्त शिक्षक पात्रता CTET /TET परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.निवड यादी तयार करतांना शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेले शिक्षक उपलब्ध न झाल्यास सदर पदावर हजर झाल्यापासून ०१ वर्षाच्या आत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीवर काही उमेदवारांची निवड / नेमणूक केली जाईल. |
| ८.३ | प्रयोगशाळा परिचर हे पद वगळून इतर सर्व पदांसाठी महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचे मार्फत घेण्यात आलेली MS-CIT परीक्षेचे प्रमाणपत्र असल्याची खात्री करून निवड यादी तयार करण्यात येईल |
| ८.४ | कनिष्ठ लिपिक कम् कॉम्प्युटर ऑपरेटर या पदासाठी इंग्रजी व मराठी टंकलेखन तसेच संगणक हाताळणीबाबतची चाचणी परीक्षा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत घेण्यात येईल. |

### ९) निवड यादीचा व प्रतिक्षा सूचिचा कालावधी :-

सदर जाहिरातीनुसार पदभरती प्रकीयेच्या अनुषंगाने निवड व प्रतिक्षासूचिचा कालावधी शासन निर्णयात विहित केल्यानुसार विधिग्राहय राहील.त्यानंतर निवड व प्रतिक्षासूचि व्यपगत होईल.

### १०) प्रमाणपत्रांची तपासणी

निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीचे ठिकाणी हजर होण्यापुर्वी सक्षम अधिकाऱ्याने दिलेली खालील प्रमाणपत्रे तपासणी / पडताळणी करण्यासाठी आदिवासी विकास आयुक्तालय, आदिवासी विकास भवन,गडकरी चौक नाशिक येथे स्वखर्चाने हजर रहावे लागेल

| | |
|---|---|
| १०.१ | जन्म दिनांकासाठी शाळा सोडल्याचा दाखला / शालान्त परीक्षा प्रमाणपत्र |
| १०.२ | सामाजिक आरक्षित पदासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात - प्रमाणपत्र |
| १०.३ | सामाजिक आरक्षित पदासाठी जात पडताळणी समितीने दिलेले जात पडताळणी प्रमाणपत्र |
| १०.४ | राष्ट्रीयत्व व आधिवास प्रमाणपत्र |
| १०.५ | महिलांसाठी असलेल्या ३०% आरक्षणानुसार खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी तसेच इतर मागास वर्ग,भटक्या जमाती ( क ) (ड) उमेदवारांना उन्नत व प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सक्षम अधिकाऱ्याचे ( Non Creamy-layer Certificate ) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. |
| १०.६ | जन्म दिनांकासाठी शाळा सोडल्याचा दाखला / शालान्त परीक्षा प्रमाणपत्र |
| १०.७ | एस.एस.सी.व एच. एस.सी परीक्षेचे गुणपत्रक / प्रमाणपत्रे |
| १०.८ | शैक्षणिक अर्हतेची मान्यताप्राप्त विद्यापीठाने दिलेली पदवी व पदव्युत्तर परीक्षेची गुणपत्रके व प्रमाणपत्रे |
| १०.९ | व्यावसायिक पात्रतेसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाने दिलेले बी.एड. / बी.पी.एड / एम. एड./ एम.एस.डब्ल्यू परीक्षेचे गुणपत्रके व प्रमाणपत्रे |
| १०.१० | केंद्र शासनामार्फत किंवा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परीषद पुणे यांचेमार्फत प्राप्त केलेली शिक्षक पात्रता परीक्षेचे ( Teacher Eligibility Test ) गुणपत्रक व प्रमाणपत्रक |
| १०.११ | जाहिरातीमधील पद क्रमांक ७ साठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे या संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रतिमिनिट तसेच मराठी टंकलेखन ३० शब्द प्रतिमिनिट उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र |
| १०.१२ | महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| १०.१३ | ज्या शासन मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून काम केले आहे त्या शाळेच्या / संस्थेच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्र |
| १०.१४ | अनुभवाच्या पुष्टयर्थ उमेदवाराच्या नेमणूकीस मान्यता दिलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे ( विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे ) मान्यतापत्र |
| १०.१५ | विवाहित महिला उमेदवारांसाठी सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र |
| १०.१६ | विवाहित महिला उमेदवाराच्या नावात बदल झाला असल्यास त्यासंबंधि अधिसूचित केलेले राजपत्र |
| १०.१७ | विवाहित उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ अन्वये अर्जाच्या दिनांकास हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहित नमुण्यातील प्रतिज्ञापत्र |
| १०.१८ | अपंग उमेदवारास अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत नुतनीकरण कलेले जिल्हा शल्य चिकित्स्क यांचे कडील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. |
| १०.१९ | प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी उमेदवारास मुदतवाढ देण्यात येणार नाही.मुदतीनंतर कोणाही उमेदवारास नेमणूकीच्या ठिकाणी परस्पर हजर होता येणार नाही. |

## ११) ऑन लाईन अर्ज सादर करण्याची पध्दत

| | |
|---|---|
| ११.१ | सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या 31 ऑक्टोबर 2018 या शेवटच्या दिनांकापर्यंत maharecruitment.mhaonline.gov.in या संकेतस्थळावर जावून online अर्ज भरण्याची link उघडावी. |
| ११.२ | भरती प्रक्रियेच्या सर्व अटी शर्ती असलेल्या जाहिरातीची / माहिती पुस्तीकेची प्रिंट काढावी. |
| ११.३ | जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार उमेदवार ज्या पदासाठी पात्र ठरत आहे त्या पदासाठी संकेतस्थळावर जावून online अर्ज भरावा. |
| ११. ४ | अर्जात नमुद केलेले सर्व रकाने भरल्यानंतर अर्जात फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन online पध्दतीने दिलेल्या ठिकाणावर UP LOAD करावी. |
| ११. ५ | प्रत्येक उमेदवारांस प्रत्येक अर्जासाठी सेवाशुल्क रुपये 20./-(अक्षरी रुपये वीस) भरावे लागतील. |
| ११. ६ | चलनाची प्रिंट काढल्यानंतर अर्जासोबत जोडलेले चलन उमेदवारांने त्याच्या जवळच्या STATE BANK OF INDIA च्या कोणत्याही शाखेत सदर चलन आवश्यक त्या रकमेसह जमा करावे. चलन जमा केल्यानंतर बँकेने परत दिलेल्या चलनाच्या प्रतिवरील क्रमांक व दिनांक संकेतस्थळावर जावून UP LOAD करावा. व पुन्हा परिपुर्ण अर्जाची प्रिंट काढून उमेदवारांने स्वतःजवळ जतन करावी. सदरची प्रिंट ही मुळ कागदपत्राची पडताळणी करण्याच्या वेळेस सादर करणे उमेदवाराला बंधनकारक राहील. |
| ११. ७ | उमेदवारांने अर्ज भरल्यानंतर त्यास अर्जाची सद्यस्थिती कळावी,लेखी व तोंडी परिक्षाचे सूचनापत्र उपलब्ध व्हावे यासाठी प्रत्येक उमेदवारांने स्वतःचा E-MAIL ID तयार करुन मोबाईल क्रमांक आणि E-MAIL ID अर्जात नमुद करणे बंधनकारक आहे. भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत E-MAIL ID व मोबाईल क्रमांक सुरु ठेवणे आवश्यक आहे. |
| ११. ८ | उमेदवाराला एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र सेवाशुल्क भरावा लागेल. |
| ११. ९ | Online भरलेला अर्ज व प्रत्यक्षात प्रिंट केलेला अर्ज या मध्ये तफावत आढळून आल्यास अर्ज रद्द करण्यात येईल. |

**१२) पदभरती प्रक्रीयेचे संभाव्य वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | 31 ऑक्टोबर २०१८ सायंकाळी ५ वाजेपर्यंत |
| २ | पदनिहाय पात्रता धारक उमेदवारांची यादी maharecruitment.mhaonline.gov.in या संकेत स्थळावर प्रसारित करण्याचा संभाव्य दिनांक | 10 नोव्हेंबर २०१८ |
| ३ | भरती प्रक्रीयेनुसार मुलाखत,अध्यापन कौशल्य,आंतरक्रिया व मूल्यमापनाचा संभाव्य दिनांक | 25 ते 3० नोव्हेंबर २०१८ |
| ४ | अंतिम निकालाचा संभाव्य् दिनांक | 3 डिसेंबर २०१८ |
| ५ | निवड यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचा संभाव्य् दिनांक | 7 डिसेंबर २०१८ |

स्वाक्ष प्रतिवर मा. आयुक्त, महोदय यांची मान्यता असे.

सदस्य सचिव
*महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी*
*तथा आयुक्त आदिवासी विकास विभाग*
*महाराष्ट्र राज्य,नाशिक*

# महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक
## एकलव्य निवासी शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती
## जाहिरात क्र.१ सन २०१८-२०१९
## अर्जाचा नमूना

---

प्रति,
मा. सदसय सचिव,
महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक
तथा आयुक्त, आदिवासी विकास,विभाग
महाराष्ट्र राज्य, नाशिक -४२२ ००२

अर्जदाराचा फोटो

**पदनाम**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | आडनाव | स्वतःचे नाव | वडिलांचे / पतीचे नाव | | | | | | |
| २ | अर्जदार विवाहित महिला असल्यास विवाहापूर्वीचे नाव | आडनाव | स्वतःचे नाव | वडिलांचे / पतीचे नाव | | | | | | |
| ३ | पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (मराठी व इंग्रजी भाषेत ) ( दुरधवनी क्रमांकासह ) | ई मेल आय डी | दुरधवनी क्र. | | | | | | | |
| ४ | जन्म दिनांक ( अंकी ) | दिनांक | महिना | वर्ष | | | | | | |
| ५ | जन्म दिनांक अक्षरी | | | | | | | | | |
| ६ | दिनांक 31/१०/२०१८ रोजी पूर्ण होणारे वय | वर्ष :- | महिने :- | दिवस :- | | | | | | |
| ७ | धर्म व जात | | ८ | लिंग -पुरूष / महिला ( ) | | | | | | |
| ९ | अर्जदाराने ज्या जात प्रवर्गातून अर्ज केला आहे.त्या जात प्रवर्गांच्या चौकोनात 'होय ' असे लिहावे. | अन. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती भटक्या जमाती अ | ब | क | ड | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | खुला |
| १० | उमेदवाराकडे जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय ? ( होय / नाही ) ( ) | | | | | | | | | |
| ११ | महिला उमेदवाराने महिला आरक्षणातून निवड होण्यासाठी अर्ज केला आहे काय ? ( ) | | | | | | | | | |
| १२ | अर्जदार विवाहित आहे काय ? | होय / नाही | असल्यास अपत्यांची संख्या<br>दिनांक २८/३/२००५ नंतर<br>दिनांक २८/६/२००६ नंतर | | | | | | | |
| १३ | राष्ट्रीयत्व | | | | | | | | | |
| १४ | महाराष्ट्रातील मूळ रहिवासी आहेत काय ? होय / नाही ( )<br>असल्यास मूळ राहण्याचे गाव | तालुका | जिल्हा | | | | | | | |
| १५ | माजी सैनिक असल्यास<br>चौ नोत'होय'असे लिहावे.) | माजी सैनिक | सेवेत असतांना युद्धात दिवंगत झाल्याने / वैद्यकीय दृष्टया कायमचे अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांचे अर्जदार हे पाल्य / पत्नी आहे काय ? | | | | | | | |
| | | | सैनिक कल्याण बोर्डात नाव नोंदणी केली आहे ? | | | | | | | |
| १६ | उमेदवार प्रकल्पग्रस्त आहे काय ? | होय /नाही | असल्यास जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव नमूद आहे काय ? | | | | | | | |
| १७ | शासन निर्णयानुसार जिल्हास्तर / | होय / नाही | क्रीडा प्रकार - | | | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | राज्य स्तरावरील खेळाडू उमेदवाराकडे जिल्हा क्रीडा अधिकारी / संचालक क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील प्रमाणपत्र आहे काय ? | | जिल्हा स्तर -<br><br>राज्य स्तर - | |
| १८ | अपंग उमेदवाराकडे नुतनीकरण केलेले जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडील प्रमाणपत्र आहे काय? | होय / नाही | अपंगत्वाचा प्रकार<br>१) अल्पदृष्टी<br>२) बहिरेपणा<br>३) अस्थिव्यंग | |

**१९ .दिनांक 31 ऑक्टोबर २०१८ रोजी अर्जदाराने धारण केलेली शैक्षणिक / व्यावसायिक अर्हता**

| अ.न. | परीक्षा प्रकार | अध्यापन विषय | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | शेकडा गुण | विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | S.S.C. | | | | | | |
| २ | H.S.C. | | | | | | |
| ३ | B.A | | | | | | |
| ४ | B.Sc | | | | | | |
| ५ | M.A | | | | | | |
| ६ | M.Sc | | | | | | |
| ७ | B.Ed | | | | | | |
| ८ | B.P.Ed | | | | | | |
| ९ | TET Exam | | | | | | |
| १० | MS-CIT | | | | | | |
| ११ | टंकलेखन | इंग्रजी ४० wpm | | | | | |
| | | मराठी ३० wpm | | | | | |
| १२ | MSW | | | | | | |
| १३ | M.Phil | | | | | | |
| १४ | Ph.D | | | | | | |
| १५ | Other | | | | | | |
| १६ | इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षण झाले असल्यास<br>शाळेचे नाव | | | | इयत्ता पासून पर्यंत | | |

२० अनुभव :-

| अ.न. | संस्थेचे नाव | पदनाम | अनुभव | | अनुभवाचा कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | | | |

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,मी पदभरतीची जाहिरात काळजीपूर्वक वाचली आहे.सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी / शर्ती मला मान्य आहेत.अर्जामध्ये नमूद केलेली माहिती खरी व बरोबर असून त्याच्या सत्यतेसाठी अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, सक्षम अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला, जात पडताळणी समितीचे जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र,विवाहित महिलांच्या बाबतीत विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र, लहान कुटुंब प्रमाणपत्र,मागास वर्गीय व खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणासाठी अर्ज केल्याने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र,शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेचे गुणपत्रके व प्रमाणपत्रे,अनुभव प्रमाणपत्र इ. सर्व प्रमाणपत्रे Upload केले आहे.

स्थळ
दिनांक

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

एकलव्य निवासी शाळेमधील शिक्षक व
शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: एकलव्य-२०१८/प्र.क्र.१२८ /का-१३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ७ मे, २०१८.

वाचा:- १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शाआशा-२०१३/प्र.क्र. ६८२/का-१३, दि.७/५/२०१५.

२) आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.आस्था-२०११/प्र.क्र.३१(भाग-१)/का-१५, दि. २०/२/२०१६.

प्रस्तावना:

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या हेतूने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अन्वये प्राप्त होणाऱ्या निधीतून राज्यामध्ये "एकलव्य निवासी शाळा" सुरु करण्यात आलेल्या आहेत. संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये एकलव्य निवासी शाळेमधील प्राचार्य, पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक, प्रशिक्षित पदवीधर शिक्षक, क्रीडा शिक्षक नि विषय शिक्षक, अधिक्षक, स्त्री अधिक्षिका कम् नर्स, कनिष्ठ लिपिक कम् कॉम्प्युटर ऑपरेटर व प्रयोगशाळा परिचर या पदांसाठी किमान शैक्षणिक अर्हता तसेच इयत्ता ६ वी ते इ.१२वी च्या वर्गासाठी वर्गवाढीनुसार मंजूर होणाऱ्या शिक्षकांची पदे निश्चित केलेली आहेत. संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांची विविध पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती विहित केलेली आहे. एकलव्य निवासी शाळामध्ये या सीबीएसई बोर्डाच्या अभ्यासक्रम शिकविला जातो. सदर शाळा इतर शाळांपेक्षा वेगळ्या असून गुणवत्तापूर्व शिक्षण देण्यासाठी या शाळांची स्थापना करण्यात आली आहे. या शाळेमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चाचणी घेऊन गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो. सबब, अशा शाळांमध्ये गुणवत्तापुर्ण शिक्षकांची निवड करणे आवश्यक असल्याने गुणवत्ताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची निवड होण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

१) एकलव्य निवासी शाळेतील प्राचार्य, पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक, प्रशिक्षित पदवीधर शिक्षक, क्रीडा शिक्षक नि विषय शिक्षक, अधिक्षक, स्त्री अधिक्षिका कम् नर्स, कनिष्ठ लिपिक कम् कॉम्प्युटर ऑपरेटर व प्रयोगशाळा परिचर इ. पद भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील. ऑनलाईन अर्ज मागविणेसाठी बाह्यसंस्थेची (outsourcing) निवड करण्यात येईल.

२) उमेदवाराकडून आवश्यक असलेल्या सर्व माहितीचा समावेश असलेला अर्जाचा नमुना बाह्यसंस्थेबरोबर चर्चा करुन काळजीपूर्वक तयार करण्यात येईल.

३) उमेदवाराने अर्जासोबत संबंधित पदांसाठी आवश्यक सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. त्यासाठी बाह्यसंस्थेद्वारे तयार करण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीमध्ये आवश्यक सुविधा असल्याची खात्री करण्यात यावी.

४) एकलव्य निवासी शाळेमधील संबंधित पदांसाठी निश्चित केलेल्या किमान अर्हतेच्या परिक्षेमध्ये (उदा. इ. १२वी पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच B.Ed, B.P.Ed, इ.) किमान ६०% गुण असणे आवश्यक राहील.

५) एकलव्य निवासी शाळा या सी.बी.एस.ई. इंग्रजी माध्यमाच्या असल्याने त्यामध्ये निवडण्यात येणाऱ्या शिक्षकांचे (मराठी व हिंदी भाषा वगळता) शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेले असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

६) विषयनिहाय रिक्त जागांसाठी किमान १:३ या प्रमाणात उमेदवारांची गुणवत्तेनुसार जातीच्या प्रवर्गनिहाय निवड यादी बाह्यसंस्थेकडून करुन घेण्यात येईल. नियुक्ती प्राधिकाऱ्याने प्रवर्ग व समांतर आरक्षण निहाय यादी तयार करून भरती प्रक्रीयेसाठी उपस्थित राहणेसाठी किमान २० दिवस अगोदर कळवावे.

७) प्राचार्य, पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक, प्रशिक्षित पदवीधर शिक्षक, क्रीडा शिक्षक नि विषय शिक्षक, अधिक्षक, स्त्री अधिक्षिका कम् नर्स, कनिष्ठ लिपिक कम् कॉम्प्युटर ऑपरेटर व प्रयोगशाळा परिचर या या पदांसाठीची निवड उमेदवाराचे शालेय परिक्षांतील गुण (इ. १२वी, पदवी, पदव्युत्तर पदवी, B.Ed, B.P.Ed ), Basic aptitude test, अध्यपन कौशल्य मुल्यमापन यांच्या आधारे Experts मार्फत करण्यात येईल.

८) संबंधीत पदांसाठी विहीत केलेली किमान अर्हतेपेक्षा अधिकची अर्हता, संबंधित पदावरील अनुभव, इंग्रजी भाषेचे ज्ञान यासाठी स्वतंत्र गुण देण्यात येतील.

९) नियुक्ती प्राधिकाऱ्याकडुन पद भरतीसाठी विभागातील अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली निवड समित्या स्थापन करण्यात येतील. सदर समित्यामध्ये विभागाचे अधिकारी, विषयतज्ञ, मानसशास्त्रज्ञ इ.चा समावेश करण्यात येईल. निवड समितीवरील सदस्यांनी मुलाखतीपूर्वी NCERT च्या पुस्तकातील अभ्यासक्रम पाहणे आवश्यक आहे.

१०) उमेदवारांचे मुल्यमापन करण्यासाठी नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून मापदंड ठरविण्यात येतील व निवडीसाठी किमान गुण निश्चित करण्यात येतील.

११) उमेदवारांचे निश्चित केलेल्या मापदंडानुसार मुल्यमापन करुन विविध मापदंडासाठी गुण देण्याची जबाबदारी निवड समितीची राहील.

१२) मुलाखतीपूर्वी सर्व पॅनलवरील सदस्यांना मापदंडानुसार गुणदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात येतील.

...३...

१३) शालेय परिक्षांतील गुण, Basic aptitude test, अध्ययन कौशल्य मुल्यमापन यांच्या एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणांकन यादी तयार करुन निश्चित केलेल्या किमान गुणानुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय निवड यादी निवड करण्यात येईल.

१४) सदर शाळांसाठी भरण्यात येणा-या पदांसाठी शासनाने विहित केल्याप्रमाणे आरक्षण लागू राहील.

१५) मुल्यमापन चाचणी झाल्यानंतर उमेदवारांची प्रवर्गनिहाय यादी परिक्षेच्या शेवटच्या दिवशी जाहीर करण्यात येईल.

१६) सदर शासन निर्णयावरील सूचनांच्या अनुषंगाने शिक्षक भरती प्रक्रियेसाठी सर्वसाधारणपणे दरवर्षी नोव्हेंबर/डिसेंबर महिन्यात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी व एप्रिलमध्ये निवड प्रक्रिया पूर्ण करण्याबाबतची दक्षता सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी घ्यावी.

१७) एकलव्य निवासी शाळा या राज्य स्तरावरील सोसायटीच्याव्दारे संनियंत्रण होणाऱ्या शाळा असून, निवड चाचणीद्वारे गुणवत्तेनुसार निवडलेल्या राज्यातील विविध विभागातील आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असल्याने या शाळांमधील शिक्षक भरतीसाठी "पेसा" क्षेत्राच्या तरतूदी लागू राहणार नाहीत.

१८) एकलव्य निवासी शाळेमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे प्रथम तीन वर्षासाठी मानधन देय राहील.

| अ. क्र. | पदनाम | प्रतीमाह मानधन रूपये |
|---|---|---|
| १ | प्राचार्य | ६०,०००/ |
| २ | पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक | ४५,०००/- |
| ३ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | ३५,०००/- |
| ४ | क्रिडा शिक्षक नि विषय अध्यापक | ३५,०००/- |
| ५ | अधिक्षक ( पुरुष ) प्रशिक्षित पदवीधर | २५,०००/- |
| ६ | स्त्री अधिक्षिक कम्-नर्स (प्रशिक्षित पदवीधर ) | २५,०००/- |
| ७ | कनिष्ठ लिपिक कम् कंप्युटर ऑपरेटर | १५,०००/ |
| ८ | प्रयोगशाळा परिचर | १२,०००/- |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( सु. ना. शिंदे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.४०० ०३२.
३. मा.मंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

...४...

४. सर्व मा. मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
६. सर्व मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. सर्व मा. विधानसभा सदस्य.
८. सर्व मा. विधानपरिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. मा. सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१३. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक
१६. अपर आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नागपूर / नाशिक/ ठाणे / अमरावती.
१७. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१८. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
१९. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२३. सर्व उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
२४. उप सचिव ( व्यय-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. सर्व मुख्याध्यापक, शासकिय आश्रमशाळा.
२६. निवडनस्ती (का-१३) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.